नियमीत दावा क्र. १४५/२०१७
अमोल वि. सोनाजी

**आदेश नि.क्र. ३३ वर**

१. वादीने अर्ज सादर केला की, दिनांक ०६.०६.२०२३ रोजी झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन वादीला पुरावा देण्याची संधी देण्यात यावी.

२. वादीचे म्हणणे की, वादी हा पोट भरण्याकरीता परगावी मजुरी करीता गेल्यामुळे गेल्या २ वर्षात तो विधिज्ञांच्या संपर्कात न राहिल्यामुळे त्याला त्या २ वर्षात दाव्याच्या स्टेज बद्दल माहिती नव्हती. त्यामुळे वादी हा न्यायालयात त्यांच्या साक्षीदारांना घेऊन हजर राहू शकला नाही. तसेच वादी हा गडबडीत त्याचे आधारकार्ड विसरल्यामुळे त्याला पुरावा देता आला नव्हता. जर वादीला पुरावा देता आला नाही, तर त्याचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होईल. सबब, पुरावा बंदचा आदेश रद्द करुन वादीला पुरावा देण्याची संधी द्यावी, अशी विनंती वादीने केली.

३. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक ३५ अन्वये सादर केले. प्रतिवादींचे म्हणणे की, वादीने काल्पनीक घटना तयार करुन दावा दाखल केला आहे. वादी हा फक्त वेळ वाया घालविण्यासाठी चुकीचे कथन करुन प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. वास्तविक वादी हा गावीच होता व त्याने अर्जात दर्शविले कारण चुकीचे आहे. वादीला पुरावा देण्यासाठी वेळोवेळी संधी देण्यात आलेली होती. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर होण्याच्या पात्रतेचा आहे. त्यामुळे दिनांक ०६.०६.२०२३ रोजी झालेला आदेश योग्य आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करण्याचा यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, दाव्यात दिनांक १३.०७.२०१८ रोजी निशाणी क्रमांक २१ अन्वये मुद्दे निश्चित करण्यात आले होते. तेव्हा पासुन प्रकरण हे वादीच्या पुराव्यावर होते. परंतु, वादीने आजपावेतो कोणताही पुरावा दिलेला नाही. वादीने वेळोवेळी पुरावा देण्यासाठी संधी मिळणेकामी अर्ज दिलेले होते व ते अर्ज न्यायालयाने मंजुर देखील केले होते. सबब, अभिलेखावरुन स्पष्ट दिसते की, वादीला न्यायालयाने पुरावा देण्यासाठी पुरेपुर संधी दिलेली होती.

५. तसेच वादीने निशाणी क्रमांक २८ व निशाणी क्रमांक २९ अन्वये पुरावा देण्यास मुदत मिळण्यासाठीचे अर्ज दाखल केले होते. ते दोन्ही अर्ज देखील 'शेवटची संधी' म्हणुन अनुक्रमे दिनांक ०७.१२.२०२२ व ३०.०१.२०२३ रोजी मंजुर करण्यात आले होते. परंतु, असे असतांना देखील वादीने पुन्हा निशाणी क्रमांक ३० व निशाणी क्रमांक ३१ अन्वये पुरावा देण्यासाठी संधी मिळण्यासाठी अर्ज दाखल केले होते. दिनांक २२.०२.२०२३ रोजी

निशाणी क्रमांक ३० वर आदेश पारीत करुन सदरचा अर्ज पुढील आदेशासाठी न्यायालयाने दिनांक ०३.०४.२०२३ रोजी ठेवला होता. परंतु, त्या दिवशी देखील वादीने पुरावा देण्याऐवजी पुन्हा निशाणी क्रमांक ३१ वर पुरावा देण्यासाठी संधी मिळण्याचा अर्ज दिला. त्यामुळे दिनांक ०३.०४.२०२३ रोजी वादीचे निशाणी ३० व निशाणी ३१ वरील अर्ज नामंजुर करण्यात येऊन प्रकरण हे पुढील आदेशावर दिनांक ०६.०६.२०२३ रोजी ठेवण्यात आले होते. परंतु, दिनांक ०६.०६.२०२३ रोजी देखील वादीने पुरावा देण्याऐवजी पुन्हा निशाणी क्रमांक ३२ वर पुरावा देण्यासाठी संधी मिळण्याचा अर्ज दिला. त्यामुळे शेवटी न्यायालयाने वादीचा निशाणी क्रमांक ३२ वरील अर्ज 'नामंजुर' करुन वादीचा पुरावा बंद करण्याबाबत निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारीत केला.

६. अभिलेखावरुन स्पष्ट दिसते की, वादीला दिनांक ०७.१२.२०२२ पासुन अंतिम संधी देण्यात येऊन सुध्दा वादीने दिनांक ०६.०६.२०२३ पावेतो त्याचा पुरावा दिलेला नाही. वादीला पुरेपुर संधी मिळुन सुध्दा त्याने दिनांक ०७.१२.२०२२ नंतर देखील पुरावा देण्यासाठी मुदत मिळणे बाबतचे अर्ज दाखल केलेले होते. वादीने पुरावा देण्याऐवजी मुदतच मागितलेली आहे. वादीला पुरेपुर संधी असुन सुध्दा त्याने त्याचा फायदा न घेता वेळोवेळी मुदत मागुन प्रकरण आजपावेतो लांबविलेले आहे.

८. परंतु, वादीने दावा मिळकतीमध्ये वाटणी मिळण्यासाठी व झालेले खरेदीखत वादीच्या हक्कावर बंधनकारक नाही, हे जाहिर करून मिळणे बाबत दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे दाव्याचे एकंदरीत स्वरुप पाहता जास्त तांत्रीक दृष्टीकोन न ठेवता सौम्य दृष्टीकोन ठेऊन वादीला एक अंतिम संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोनातुन योग्य होईल. कारण वादीचा पुरावा अभिलेखावर आला नाही तर त्यांना त्यांची बाजू मांडता येणार नाही. तसेच प्रकरण गुणवत्तेवर चालण्यास अडचण निर्माण होईल. नैसर्गीक न्यायतत्वानुसार वादीला त्याचा पुरावा देण्यासाठी एक अंतिम संधी देणे आवश्यक आहे. अर्ज जर नामंजूर केला तर प्रकरणात पुन्हा गुंतागुंत वाढून वेळ वाया जाईल व प्रकरण पुन्हा प्रलंबीत पडेल. परंतु वादीने पुरावा देण्यासाठी केलेला विलंब हा नजरेआड करता येणार नाही. त्यामुळे त्याने केलेला विलंब लक्षात घेता त्याचा अर्ज कॉस्ट लावून मंजूर करणे न्यायोचीत होईल येईल. करिता खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. वादीचा अर्ज निशाणी ३३ हा खालील अटी व शर्तींवर शेवटची व अंतिम संधी म्हणुन मंजूर करण्यात येतो–

अ. दिनांक ०६.०६.२०२३ रोजी झालेला पुरावा बंदचा आदेश रुपये

१,५००/- ची कॉस्ट या अटींवर रद्द करण्यात येतो.

**ब.** रुपये १,५००/- ची कॉस्ट न्यायालयात आज अथवा पुढील तारखेस भरल्यानंतरच वादीचा पुरावा दाखल करुन घेण्यात यावा.

**क.** वादीला निर्देश देण्यात येते की, त्याने आज अथवा पुढील तारखेस कॉस्टची रक्कम भरुन त्याचा पुरावा लगेचच सादर करावा, अन्यथा तसे करण्यास चुकल्यास दाव्यात योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

**स्वाक्षरीत/-**

दिनांक ०१/१२/२०२३

( राहुल भि. सुर्यवंशी )

सह दिवाणी न्यायाधिश (क. स्तर), परतूर